# वसई-विरार शहर महानगरपालिका
## वैद्यकीय आरोग्य विभाग

दि.१६/०५/२०२४

**राष्ट्रीय डेंग्यू दिवस**

डेंग्यू हा अतिशय गंभीर स्वरूपाचा आजार आहे. दि.१६ मे हा दिवस “राष्ट्रीय डेंग्यू दिवस” म्हणून साजरा केला जातो. हा दिवस साजरा करण्यामागचा उद्देश लोकांना डेंग्यू आजाराबद्दल माहिती व जनजागृती करणे हा आहे.

दरवर्षी प्रमाणे या वर्षीही दि.१६ मे २०२४ रोजी राष्ट्रीय डेंग्यू दिवस साजरा करण्यात आला. या वर्षाचे घोषवाक्य “Connect with Community, Control Dengue” म्हणजेच “समुदायाच्या संपर्कात राहा, डेंग्यूला नियंत्रित करा” असे आहे. "आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस पाळावा" असाही संदेश देण्यात आला.

याअनुषंगाने मा.वैद्यकीय आरोग्य अधिकारी व मा.साथरोग अधिकारी यांनी डेंग्यू या आजाराबाबत नियोजन करण्यासाठी आरोग्य कर्मचाऱ्यांची सभा घेऊन मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांमार्फत आपल्या स्तरावर राज्य आरोग्य निरीक्षक, आरोग्य कर्मचारी, ए.एन.एम., आशा व औषध फवारणी कर्मचारी यांनी जनजागृती प्रभातफेरी काढली.

ए.एन.एम. व आशा कर्मचाऱ्यांमार्फत माईक अनाऊंसमेंट द्वारे डेंग्यू आजारा संदर्भात विविध सूचना नागरिकांना देण्यात आल्या. तसेच विविध ठिकाणी डेंग्यूबाबत गटसभा आयोजित करून माहिती देण्यात आली. तसेच नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये डेंग्यू आजाराबाबत बॅनर लावून तसेच पत्रके वाटून नजागृती करण्यात आली.

त्याचप्रमाणे नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या स्तरावर डेंग्यूची लक्षणे व प्रतिबंधात्मक उपाययोजना या संबंधी प्रदर्शन भरवून आरोग्य शिक्षण देण्यात आले. त्याचप्रमाणे विविध कार्यक्रम व स्पर्धांचे आयोजन करून डेंग्यू या आजाराबाबत जनजागृती करून नागरिकांना प्रतिबंधक उपचाराबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

**वैद्यकीय आरोग्य विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**